**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१८/२०२२.</u>**
**निशाणी क्र.१३ वरील आदेश**
(योगेश गणपत गुरव उर्फ सावंत वि. वैभव विष्णू गुरव उर्फ सावंत व.१५)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मुळ अर्जातील सामनेवाला क्र.१२ कै. मनोज शांताराम सावंत यांचे वारस रेकॉर्डवर आणणेकामी झालेला विलंब माफ होवून मिळणेकरिता म्हणून दिलेला आहे.

२. अर्जदार यांचे प्रस्तुत अर्जातील थोडक्यात कथन की, यातील सामनेवाला क्र.१२ मनोज शांताराम सावंत हे दि.२०/०३/२०२४ रोजी कांदिवली मुंबई येथे मयत झालेले आहेत. त्यांचे कौटूंबिक अडचणीमुळे तसेच वेळीच मृत्यूदाखला उपलब्ध करता न आल्याने त्यांना सदर सामनेवाला क्र.१२ यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर करता आले नाहीत. सदरचे वारस रेकॉर्डवर न घेतल्यास अर्जदार यांचे नुकसान होणारे आहे. सदरचे वारस रेकॉर्डवर घेण्यास १५ महिन्यांहून अधिक काळ इतका विलंब झालेला असून विलंब क्षमापित करुन प्रस्तुतचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळावी तसेच निशाणी क्र.१ मध्ये दुरुस्तीस मुभा असावी अशी विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर सामनेवालातर्फे म्हणणे देवून मे. न्यायालयाने योग्य ते आदेश पारीत करावेत असे नमुद केलेले आहे.

४. प्रस्तुत अर्ज, सामनेवालाचे म्हणणे व दोन्ही बाजूंकडील विद्वान विधीज्ञांच्या युक्तीवादाचे अवलोकन केले.

५. अर्ज व म्हणणे वाचले. मुळ दाव्यातील कागदपत्रांची पाहणी केली असता असे दिसून येते की, सदरचे सामनेवाला क्र.१२ कै. मनोज शांताराम सावंत हे दि.२०/०३/२०२४ रोजी मयत असल्याचे दिसते. परंतू, अर्जदार यांनी मयत सामनेवाला क्र.१२ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ करणेस अर्ज देणेस विषद केलेले कारण हे संयुक्तीक असल्यास सदरचा विलंब हा माफ करणे उचित होणार आहे. सबब,

प्रस्तुत अर्ज निकाल करीत असताना अर्जदार यांनी अर्जाद नमुद केलेले कारण संयुक्तीक आहे किंवा कसे हे पाहणे महत्वाचे आहे.

**६.** अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केलेल्या कारणाचा विचार करता सदर झालेला विलंब माफ करणे प्रथम दर्शनी संयुक्तिक वाटते. तसेच मुळ अर्जाचा गुणदोषांवर निकाल होणेसाठी मयत सामनेवाला क्र.१२ यांच्या कायदेशीर वारसांना सदर अर्जातील पुढील गुंतागुंत टाळण्यासाठी पक्षकार म्हणून सामील करुन घेणे गरजेचे आहे. मयत सामनेवाला क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे इतर सामनेवालांचे कोणतेही नुकसान उद्भवत नाही. याउलट अर्जाचा अंतिम निर्णय करणेसाठी मदत होणार आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज (**निशाणी क्र.१३**) मंजूर करणेत येतो.

२) प्रस्तुत अर्जाचे कामी अर्जदार यांनी सामनेवाला क्र.१२ मयत मनोज शांताराम सावंत यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारसांबाबत तजवीज करणेस झालेला विलंब माफ करणेत येतो.

दिनांकः–०४/०९/२०२५
ठिकाण – रत्नागिरी.

**(एस. एस. हाके)**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**राजापूर.**